# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष–२ ■ अंक–८ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २६ सप्टेंबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# नागरिकांच्या हितासाठी क्लस्टरची पारदर्शक अंमलबजावणी आवश्यक





## उच्च न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसारच क्लस्टर योजनेची अंमलबजावणी करा

## संजय घाडीगांवकर यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

### बाधितांना शासकीय रेडी रेकनर नुसार किमान घरभाडे १२ ते १५ हजार करण्याची मागणी

**ठाणे:–नागरिकांचे हित लक्षात घेऊन उच्च न्यायालयात दिलेल्या सत्यप्रतिज्ञा पत्रानुसारच ठाणे शहर व महापालिका क्षेत्रात क्लस्टर योजनेची पारदर्शक व कायदेशीर अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे माजी गटनेते संजय घाडीगांवकर यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.**

मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात घाडीगांवकर यांनी म्हटले आहे की, शासन– महापालिका प्रशासन यांनी उच्च न्यायालयात दिलेल्या सत्यप्रतिज्ञापत्रानुसारच काम करावे. याकरिता आम्ही यासंदर्भात दिलेल्या तिन्ही पत्रांचे पुन्हा अवलोकन करावे, अन्यथा तांत्रिक –कायदेशीर चुका व राजकीय स्वार्थासाठी घाईत घेतलेले प्रशासकीय निर्णय यामुळे किसन नगर णठउ चे विकास प्रस्ताव हे निवडणुक जिंकण्यासाठी एक गठ्ठा मतांचे राजकीय मोहरे ठरतील आणि सबंधित बाधित नागरिकांचा नाहक बळी जावू शकतो अशी भीती घाडीगांवकर यांनी या पत्रात व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिक म्हणून माझ्या खालील प्रश्नाची उतरे सबंधित अधिकारी यांनी बाधित नागरिकांना देण्यासाठी आदेश मुख्यमंत्री यांनी द्यावेत अशी विनंती करत घाडीगांवकर यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत.उच्च न्यायालयात Impact Assesment Report बाबत दिलेल्या सत्यप्रतिज्ञापत्रानुसारच क्लस्टर योजनेची पारदर्शक अंमलबजावणी करणेकरीता महापालिकेने सर्व सबंधित तांत्रिक व कायदेशीर पूर्तता करून एकत्रित लेआउट प्रसिद्ध करण्यात कायदेशीर अडचण कोणती आहे ?

जमीन मालक ,लीज होल्डर, MIDC, महसूल विभाग यांच्या कडून कायदेशीर पूर्तता करून जमिनी संपादित – ताब्यात घेवून सबंधित भूखंड शासन / ठाणे महापालिका यांच्या नावे करण्यात येवून त्यांनतर इमारत बांधकाम,नकाशे मंजूर करण्याची कायदेशीर प्रक्रिया करण्यात का आलेली नाही ? ( किसन नगर णठउ च्या विकास प्रस्तावाप्रमाणे जमिनी संपादित न करता बेकायदेशीर पणे नियमबाह्य नकाशे का मंजूर केलेले आहेत ? ) क्लस्टर योजनेतील सर्व बाधित नागरिकांसाठी शासनाने सर्व विकासक संस्थासाठी बनविलेल्या रेरा कायद्यानुसारच सबंधित नवीन होणा–या बांधकामांची कालमर्यादा लेखी नोंदणीकृत हमी पत्राद्वारे शासन / महापालिका यांनी क्लस्टर योजनेतील बाधित ठाणेकर नागरिकाना देण्यासाठी कायदेशीर अडचण कोणती आहे ?क्लस्टर योजनेतील बाधित नागरिकांसाठी सदनिका रिक्त नसल्यास जे पूर्वीचे घरभाडे रु ६००० रद्द करून किमान रू.८००० /– घरभाडे ठरविण्यात आलेले आहे ते बाजारभावाप्रमाणे नाही. पण किमान शासकीय रेडी रेकनर नुसार किमान घरभाडे रू.१२०००/– ते १५०००/– रुपये करण्यासाठी कायदेशीर अडचण काय आहे.? सबंधित घरभाडे रेरा कायद्यानुसारच लेखी नोंदणीकृत हमी पत्रानुसार बाधितांच्या बँक खात्यात किमान वर्षभराचे आगावू घरभाडे जमा करण्यात येवून, त्यानंतर लेखी हमी पत्रानुसार महिन्याच्या १ तारखेला खात्यात घरभाडे जमा करण्यात कायदेशीर अडचण काय आहे. ? ठाणे महापालिकेकडील म्हाडा .सिडको, ULC ,BSUP, MMRDA, विविध विकास प्रकल्पाअंतर्गत किती सदनिका रिक्त / उपलब्ध झालेल्या आहेत यांची माहिती घेवून अतिधोकादायक उ–१ इमारती मधील नागरिकांसाठी व क्लस्टर योजनेतील बाधित नागरिकांसाठी त्या आरक्षित / राखीव करण्यात का आलेल्या नाहीत ?

ह्या उसळलेल्या महागाईच्या काळात क्लस्टर योजनेने बाधित स्थलांतरीत होणाऱ्या परिवारावर नवीन खर्चाचा बोजा पडणार नाही याकरिता प्रशासन प्रथम संक्रमण इमारतीची / शिबिरांची बांधकामे क्लस्टर योजनेच्या नियोजित बांधकामापासून किमान अर्धा किलोमीटर ते कमाल १ किलोमीटर अंतरामध्येच प्रशासन नैसर्गिक न्यायानुसार का निर्माण करीत नाहीत ?

कोणत्याही राजकीय पक्षाशी सबंधित व्यक्ती –कार्यालयाचा वापर न होता ज्या ठिकाणी क्लस्टर योजनेतील नियोजित बांधकामास सुरुवात होणार आहे, त्याठिकाणी शासकीय जागा उपलब्ध असतानाही क्लस्टर अंमलबजावणी सेल अंतर्गत तात्पुरते जनसंपर्क व मदत कार्यालय सुरु करून तेथूनच सर्व कामकाज करण्याकरीता प्रशासनास कोणती अडचण आहे?

काही राजकीय पक्षाच्या पदाधिकारी यांनी बाधित नागरिकांना विश्वासात न घेता बेकायदेशीरपणे बनविलेल्या (नियोजित) किसन नगर वागळे इस्टेट १ गृहनिर्माण Hsg सोसायटीला ग्राह्य का धरण्यात आलेले आहे? ठाणे महापालिका क्षेत्रात आणि किसननगरमध्ये क्लस्टर योजनेची मंजुरी झालेली आहे व नागरी सुविधांबाबत Impact Assesment Report नुसार दिलेल्या सत्यप्रतिज्ञापत्राप्रमाणे क्लस्टर योजना जर सर्व नागरी सुविधासह मंजूर आहे तर मग शासन व महापालिका निधीची करोडो रूपयांची नागरी सुविधांची कामे ( रस्ते, नाले, ड्रेनेज ,पूल गटारे, पायवाटा,जलवाहिनी ) नव्याने का मंजूर केली जात आहेत ?

क्लस्टर योजनेने बाधित–स्थलांतरीत होणाऱ्या व्यापारी वर्गाच्या जागाबाबत घेतलेला निर्णय (संक्रमण शिबिरातील जागा आणि भविष्यात भेटणारी जागा बद्दल) अधिकृत पणे जाहीर का केला जात नाही ?असे अनेक प्रश्न संजय घाडीगांवकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पत्रात उपस्थित केले आहेत.सदर प्रश्न सोडवण्याची मागणी घाडीगांवकर यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, २६ सप्टेंबर २०२२



# दिवा स्थानकातील बंद वॉटर वेंडिंग मशीन कार्यान्वित करा

## प्रवासी संघटनेची मागणी


**ठाणे:** मागणी अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असलेल्या दिवा रेल्वे स्थानकावरील वॉटर वेंडिंग मशीन तात्काळ कार्यान्वित कराव्यात अन्यथा प्रवाशांना अडचण ठरत असलेल्या या वॉटर वेंडिंग मशीन फलाटांवरून काढून टाकाव्यात किंवा अन्यत्र हलवाव्यात अशी मागणी दिवेकर रेल्वे प्रवाशांतर्फे दिवा रेल्वे प्रवासी संघटनेने केली आहे.

रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना स्वस्त दरात पाणी पिण्यास मिळावं यासाठी काही वर्षांपूर्वी मध्य रेल्वे प्रशासनाने प्रत्येक स्थानकात वॉटर वेंडिंग मशीन उभारण्यात आल्या होत्या. मध्य रेल्वे मार्गावरील इतर स्थानकाप्रमाणे दिवा स्थानकात या मशीन उभारण्यात आल्या. मात्र त्या मशीनला दिव्यात भरघोस प्रतिसाद मिळत होता. त्या काळात दिवा शहरात पाण्याची भीषण टंचाई असताना या वॉटर वेंडिंग मशीन खऱ्या अर्थाने दिव्यातील रेल्वे प्रवाशांना तथा




इथल्या सामान्य नागरिकांना उपयुक्त अशा ठरत होत्या. अगदी कमी भावात पाणी मिळत असल्याने बहुतांश प्रवासी घरातून तीन-चार बॉटल सोबत घेऊन कामावरून जात व येता वेळेस त्या स्थानकातून भरून घेत होते. परंतु मात्र याचे कंत्राट ज्या ठेकेदारांना मिळाले होते, त्यांनी वीज बिल व इतर बिलं थकवल्याने या सर्व मशीन मागील तीन ते चार वर्षापासून बंद अवस्थेत फलाटांवर मध्यभागी धुळखात उभ्या आहेत. असा आरोप प्रवासी संघटनेने केला आहे. दिवा शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून दिवा स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या देखील प्रचंड वाढली आहे. सकाळी गर्दीच्या वेळी या स्थानकात फलाटांवर उभं राहण्यासाठी सुद्धा जागा नसते. यामुळे बऱ्याच वेळा प्रवाशांना अपघाताला देखील सामोरे जावे लागते. त्यामुळे त्या वॉटर वेंडिंग मशीन तात्काळ कार्यान्वित कराव्यात अन्यथा प्रवाशांना अडचण ठरत असलेल्या या वॉटर वेंडिंग मशीन फलाटांवरून काढून टाकाव्यात किंवा अन्यत्र हलवाव्यात, अशी मागणी दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अॅड.आदेश भगत यांनी केली आहे.

# कळव्यात रस्त्यावर ऑईल सांडले



**ठाणे:** कळवा-खारेगाव रेल्वे फाटक जवळ कळवा पश्चिमकडून कळवा पूर्वे कडे जाणाऱ्या ब्रिजवरती ऑईल सांडल्याची घटना सोमवारी दुपारी पावणे एकच्या सुमारास पुढे आली. या ठिकाणी कोणालाही दुखापत नाही. तसेच या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. तसेच त्या विभागातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने रोडवरती पडलेल्या ऑईलवरती माती टाकण्यात आली. त्यानंतर, तो रस्ता वाहतूकीसाठी मोकळा करण्यात आला

# ठामपाचा लाचखोर लिपिक गजाआड

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या लोकमान्य- सावरकर प्रभाग समितीतील मालमत्ता कर विभागाचे लिपिक प्रवीण गजेंद्रनाथ सरतापे (४६) याला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी ) पाच हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. या घटनेतील तक्रारदारांनी वर्तकनगर प्रभाग समितीच्या अंतर्गत लोकमान्य नगर पाडा क्रमांक १ येथे फ्लॅट खरेदी केले असून त्यांच्या मालमत्ता हस्तांतरण व टॅक्स पावतीवरील नावात बदल करण्यासाठी त्यांनी प्रभाग समितीत अर्ज केला होता. दरम्यान, ठाणे महापालिकेच्या लोकमान्य - सावरकर नगर प्रभाग समिती मालमत्ता कर विभागात कार्यरत असलेले लिपिक सरतापे याने तक्रारदारांकडून मालमत्तावर नाव लावण्यासाठी ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. या प्रकरणी तक्रारदारांनी ठाणे एसीबी कार्यालयात तक्रार दिली होती. त्यानुसार एसीबीने याप्रकरणी २१ सप्टेंबर रोजी पडताळणी केली असता त्या लिपिकाने लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर गुरुवारी सापळा रचून एसीबी पथकाने त्या लिपिकास तक्रारदारांकडून पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना त्याच्याच कार्यालयात रंगेहाथ पकडले.

# कळव्यात रस्ता खचला

## २५ दुकानांच्या भिंतींना तडे

**ठाणे:** पारसिक डोंगरालगत असलेला रस्ता खचल्याची घटना कळवा वाघोबानगर येथे गुरुवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. तब्बल २५ दुकानांच्या भिंतीना तडे गेल्याने धोकादायक झाले आहेत. त्यामुळे खबरदारीचा उपाय त्या दुकानांना धोकापट्टी लावण्यात आली असून कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

कळवा,वाघोबा नगर,कळवा हिंदी हायस्कूल जवळ, रेल्वे फास्ट ट्रॅक जवळ, पारसिक बोगद्या बाजुला,रेल्वेच्या संरक्षण भिंतीचे नव्याने बांधकाम करण्यासाठी पारसिक डोंगरालगत खोदकाम करण्यात आले होते. त्या डोंगरालगत असलेला रस्ता खचल्याने जवळच असलेल्या २५ दुकानांच्या भिंतीना तडे गेल्याची माहिती माजी नगरसेवक महेश साळवी यांनी दिली. त्या माहितीच्या आधारे, घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, कळवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त, कार्यालयीन



अधीक्षक , कार्यकारी अभियंता , कनिष्ठ अभियंता, रेल्वे प्रशासनाचे संबंधित वरिष्ठ अभियंता व ठेकेदारांना धाव घेत, पाहणी केली असता तब्बल २५ दुकानांचे गाळे धोकादायक झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून धोकापट्टी लावण्यात आलेली आहे. तसेच रेल्वे प्रशासनामार्फत पुढील कार्यवाही सुरू असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

# ठामपा शाळेची संरक्षण भिंत कोसळली



**ठाणे:** परबवाडी येथील ठामपा शाळा क्र.१८ या शाळेची सुमारे ३५ फुट लांब व ०८ फूट उंच संरक्षण भिंत शुक्रवारी सकाळी पडली. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली. ठाणे,परबवाडी परिसरातील ज्ञानसाधना कॉलेज जवळ, शिवसेना शाखेच्या बाजूला असलेल्या ठामपा शाळेची संरक्षण भिंत पडल्याची माहिती कनिष्ठ अभियंता मनोज काळे यांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. त्यानंतर, घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, उप-अभियंता व कनिष्ठ अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांनी धाव घेतली. तसेच जेसीबी मशीनच्या सहाय्याने पडलेल्या भिंतीचे डेब्रिज बाजूला करण्याबरोबर धोकादायक झालेली भिंत पाडण्यात आली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# आमदार राजू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मनसेकडून आरोग्य शिबिराचे आयोजन

**दिवा:**– कल्याण ग्रामीणचे आमदार राजू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दिवा शहर मनसेमार्फत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नाहर हॉस्पिटल व श्रीकृपा हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेच्या माध्यमातून एन्जोग्राफी, एन्जोप्लास्टी,ओपन हार्ट सर्जरी, डायलेसिस आदी आजारांची तपासणी केली जाणार आहे. सदर शिबिराचे आयोजन दिवा शहर मनसेचे अध्यक्ष तुषार पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मुलुंड, येथे सन २०२१-२२ मध्ये घेण्यात आलेल्या अंतिम परीक्षेत ग्राफिक्स डिझाइनर या ट्रेडमध्ये गुरूदर्शन नगर, दिवा (पूर्व),ठाणे येथील रहिवाशी सौ. सीमा सुदेश सकपाळ यांनी प्रथम क्रमांक मिळवला त्याबद्दल त्यांचे गुरुदर्शन नगर रहिवाशी संघा तर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.**

# नागरिकांच्या सुविधेसाठी दिव्यात स्वतंत्र पोस्ट ऑफिस व पोस्ट कर्मचारी वाढवा -ज्योती पाटील

**दिवा :**– दिवा शहरासाठी स्वतंत्र पिनकोड निर्माण करून येथील नागरिकांना वेळेत पोस्टाची पत्र, रजिस्टर मिळावीत यासाठी दिवा पोस्ट ऑफिसमध्ये कर्मचारी वाढवावेत अशी मागणी भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी केली आहे.

ज्योती पाटील याबाबत भारत सरकारच्या संबंधित मंत्र्यांना पत्रव्यवहार करणार असून या विषयाचे गांभीर्य प्रशासनाच्या लक्षात आणून देणार आहेत. दिवा शहर हे वेगाने वाढत आहे. या शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला असून येथील लोकसंख्या सुमारे ५ लाखांच्या घरात आहे. मात्र लोकसंख्या अधिक असताना आणि भौगोलिक परिस्थिती दिवा शहराची वेगळी असताना सुद्धा दिवा शहराला मुंब्रा शहराचा ४००६१२ हा पिनकोड वापरावा लागतो. मुंब्रा आणि दिवा ही वेगळी शहरे आहेत. मुंब्रा शहरातील पिनकोड असल्याने अनेक ऑनलाइन खरेदी सेवा, लोन सुविधा मिळण्यासाठी दिव्यातील नागरिकांना अडचणी निर्माण होतात. दिव्यात स्वतंत्र पोस्ट ऑफिस नसल्याने येथील नागरिकांना पोस्टाने येणारी पत्र, रजिस्टर सेवा वेळेत मिळत नाही. ही समस्या लक्षात घेऊन भाजपच्या दिवा मंडळ महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी स्वतंत्र पोस्ट ऑफिस व दिव्यासाठी स्वतंत्र पिनकोडची मागणी केली आहे. दिवा शहरात पोस्टाच्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. तसेच पोस्टाला स्वत:ची जागा देखील नाही. दिवा शहरातील नागरिकांच्या सुविधेचा विचार करता शहरासाठी स्वतंत्र पोस्ट ऑफिस, वाढीव कर्मचारी उपलब्ध करून दयावेत. त्याचबरोबर स्वतंत्र पिनकोड दिवा शहरासाठी द्यावा अशी मागणी ज्योती पाटील यांनी केली आहे.

# दिवा आगासन रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## अभियंता व ठेकेदार यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा!

**आ.निरंजन डावखरे यांच्या नेतृत्वाखाली दिवा भाजपचे निवेदन**

**ठाणे:**–दिवा - आगासन रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम व खड्ड्यामुळे अपघात होऊन एका तरुणाचा जीव गेल्याने दिवा आगासन रस्त्याचा ठेकेदार व पालिका अभियंत्यावर तात्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी लेखी तक्रार भाजप जिल्हाध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी दिवा भाजपचे शिष्टमंडळ घेऊन ठाणे महापालिका आयुक्तांची भेट घेऊन केली आहे.



आयुक्तांना दिलेल्या पत्रात भाजपने म्हटले आहे की,या रस्त्याचे मागील पाच वर्षापासून काम सुरू आहे. अतिशय संथगतीने या रस्त्याचे काम सुरू असून ते नियमित होते की नाही याबाबत प्रश्नचिन्ह आहे.अनेक ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने काम या ठिकाणी झाल्याच्या तक्रारी देखील वारंवार अनेक नागरिकांनी केल्या आहेत. त्याचबरोबर गणेश नगर, बेडेकर नगर, आगासन पट्ट्यामध्ये या रस्त्याचं निकृष्ट दर्जाचे काम सुरू असून काम रखडलेले आहे. निकृष्ट दर्जाचे काम व अर्धवट कामाचा फटका एका तरुणाला बसला असून निकृष्ट दर्जाच्या रस्त्यामुळे गणेश उत्सवाच्या तोंडावर या तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. खड्ड्यामुळे सदर तरुणाचा हकनाक जीव गेला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात यावी व रस्त्याच्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदारावर, संबंधित अधिकाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी भाजपने केली आहे,यावेळी कोकण पदवीधर आमदार व ठाणे शहर जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे दिवा शहराध्यक्ष रोहिदास मुंडे ठाणे शहर कार्यकारणी सदस्य अशोक पाटील सरचिटणीस समीर चव्हाण महिला मोर्चा अध्यक्षा ज्योती पाटील भाजपा ओबीसी मोर्चा अध्यक्ष रोशन भगत सपना भगत वार्ड अध्यक्ष नागेश पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते

# आदेश भगत यांच्या नेतृत्वाखाली दिवा पश्चिमेतील नागरिकांची पालिकेवर धडक




**दिवा:**–अनेक वर्षे पाणी पुरवठा होत नसताना सुद्धा पाठवलेली भरमसाठ बिलं रद्द करा अशी मागणी करत दिवा पश्चिमेतील रहिवाशांनी आदेश भगत यांच्या नेतृत्वाखाली दिवा प्रभाग समिती कार्यालयावर धडक दिली. यावेळी आदेश भगत यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी पालिका अधिकाऱ्यांची भेट घेत भरमसाठ पाणी बिल रद्द करा अशी मागणी केली. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्येबाबत अँड.आदेश भगत यांनी रहिवाशांच्या वतीने पालिका सहायक आयुक्तांची यांच्याकडे बाजू मांडत नागरिकांना दिलासा देण्याची मागणी केली.

# प्रधानमंत्री मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न

## भाजप नेते शिवाजी आव्हाड यांच्या हस्ते उद्घाटन






**दिवा:**–पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा अभियान अंतर्गत दिवा रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नंबर एक येथे भारतीय जनता युवा मोर्चा दिवा शहर आयोजित भव्य रक्तदान शिबिराचे उद्घाटन भाजप प्रदेश सरचिटणीस भटके विमुक्त आघाडीचे शिवाजी आव्हाड यांच्या हस्ते पार पडले.यावेळी दिवा भाजपाध्यक्ष रोहिदास मुंडे भाजयुमो अध्यक्ष व रक्तदान शिबिराचे संयोजक सचिन भोईर, महिला आघाडी अध्यक्ष सौ ज्योती पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नरेश पवार,सौ रेशमा पवार, सपना भगत, माजी नगरसेवक अशोक पाटील,विजय भोईर ,रोशन भगत ,समीर चव्हाण ,समशेर यादव ,राहुल शाहू आदी कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी दिवा रेल्वे स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी देखील उपस्थित होते. या रक्तदान शिबिरास प्रथम रक्तदान आर पी एफचे जवान यांनी केले त्यांचे प्रशस्तीपत्रक व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# अडीच लाख विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रंगला ठाणेकरांचा स्वच्छ अमृत महोत्सव

**ठाणे :** स्वच्छ अमृतमहोत्सव कार्यक्रमातंर्गत ठाणे शहरातील ठाणे महापालिका शाळा व खाजगी शाळांमध्ये स्वच्छता व टाकावुतून टिकाऊ कलाकृती या विषयावर स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धत सर्व शाळांमधील अडीच लाख विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा शुक्रवारी दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा व माजी महापौर नरेश म्हस्के यांच्या हस्ते पार पडला. तसेच 'इंडियन स्वच्छता लीग'च्या धर्तीवर ठाणे महापालिकेने प्रभाग समिती स्तरावर आयोजित केलेल्या 'ठाणे स्वच्छता लीग' ध्वज ठाणे महापालिकेतील सर्व प्रभाग समित्यांच्या सहाय्यक आयुक्तांना देण्यात आला.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार इंडियन स्वच्छता लीग कार्यक्रमाअंतर्गत स्वच्छ अमृत महोत्सव ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त



प्रतिसाद देत हा महोत्सव यशस्वी केला. विद्यार्थ्यांनी स्वच्छ ठाणे, सुंदर ठाणे या विषयावर कल्पकतेने रेखाटलेल्या चित्रांचे मान्यवर परीक्षकांच्या माध्यमातून परीक्षण करून विजेते जाहिर करण्यात आले. तसेच टाकाऊ वस्तू वापरून टिकाऊ प्रकल्प तयार करण्याच्या स्पर्धेतही विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राजेंद्र पाटणकर यांनी केले.

## चित्रकला व टाकाऊतून टिकावू प्रकल्प बनविणाऱ्या विजेत्या स्पर्धकांचे आयुक्तांकडून कौतुक

ठामपा शाळांतील प्रथम क्रमांकांचे विजेते : इयत्ता ६ वी – दिशा वाकोडे : ठामपा शाळा क्र. ४४, इयत्ता ७ वी : खान रबीया, ठामपा शाळा क्र. ७४, इयत्ता ८ वी तनीषा सुतार, ठामपा शाळा क्र. ५२ , इयत्ता ९ वी : अन्सारी फातिमा महमंद साजीद ठामपा शाळा क्र. १३

खाजगी शाळेतील प्रथम क्रमांकांचे विजेते : इयत्ता ६ वी – पिंजरी मरीयम एजंल पॅरेडाईज स्कूल, इयत्ता ७ वी चेतना चव्हाण– यशोधन मराठी विद्यालय, इयत्ता ८ वी साहिल साबळे – श्री मॉ बालनिकेतन , इयत्ता ९ वी श्रेया कांबळे : सेंट जॉन बाप्टीस्ट स्कूल

टाकाऊतून टिकावू प्रकल्पासाठी विजेत्या ठरलेल्या खाजगी शाळा : इयत्ता ६ वी : गौतम विद्यामदिर, इयत्ता ७ वी एस.एम.जी विद्यामंदिर, इयत्ता ८ वी यू.एन.एस इंग्लीश स्कूल, इयत्ता ९ वी : एस.एम.जी विद्यालय.

टाकाऊतून टिकावू प्रकल्पासाठी प्रथम क्रमांकांचे ठामपा शाळेतील विद्यार्थी : इयत्ता ६ वी – ठामपा शाळा क्र. ६५, इयत्ता ७ वी– ठामपा शाळा क्र. ४४, इयत्ता ८ वी शाळा क्र. ४४, इयत्ता ९ वी ठामपा शाळा क्र. ८

## ठाणे स्वच्छता लीग

**'इंडियन स्वच्छता लीग'च्या धर्तीवर ठाणे महापालिकेने प्रभाग समिती स्तरावर 'ठाणे स्वच्छता लीग'चे आयोजन केले आहे. यात नऊ प्रभाग समित्यांचे नऊ संघ सहभागी झाले होते. या संघांना नौपाडा नायक, मानपाडा मावळे, उथळसर योद्धा, लोकमान्य लिजंड्स, दिवा डेअरडेव्हिल्स, मुंब्रा मस्केटिअर्स, कळवा नाईट्स, वागळे वॉरिअर्स, वर्तक वीर अशी नावे देण्यात आली असून सर्व प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांना महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या हस्ते स्वच्छतेचा ध्वज देण्यात आला.**

# स्वच्छता ही आपली जीवनशैली झाली पाहिजे -आयुक्त डॉ. विपिन शर्मा



**ठाणे :** स्वच्छता ही फक्त पंधरावड्यापुरती मर्यादित न राहत आपले ठाणे शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी स्वच्छता ही आपली जीवनशैली झाली पाहिजे असा निर्धार प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्यासमवेत उपस्थित ठाणेकरांनी केला. या अमृत स्वचछता महोत्सवात जवळ जवळ १८ हजाराहून अधिक ठाणेकरांनी आपला सहभाग नोंदविला.

केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार इंडियन स्वच्छता लीग हा स्वच्छता विषयक देशव्यापी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून अमृत स्वच्छता महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या हस्ते उपवन येथे झाले. यामध्ये अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, माजी उपमहापौर पल्लवी कदम, माजी नगरसेवक विकास रेपाळे, माजी नगरसेविका जयश्री डेव्हिड, उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, बाळासाहेब चव्हाण, अनघा कदम, जी.जी गोदेपुरे, नगरअभियंता प्रशांत



सोनाग्रा, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, प्रदुषण अधिकारी मनिषा प्रधान, वैदयकीय अधिकारी बालाजी हळदेकर व सर्व प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त तसेच महापालिका अधिकारी कर्मचारी यांच्यासह शिक्षक, महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रत्येक नागरिकांनी स्वच्छता ही केवळ महापालिकेची जबाबदारी नाही तर ती प्रत्येक ठाणेकराची जबाबदारी आहे, या भावनेने वागले तर आपले शहर हे नेहमीच स्वच्छ राहिल, त्यामुळे आपले शहर हे पंधरवड्यापुरता स्वच्छ न ठेवता ते नेहमीच स्वच्छ राहिल याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे असेही महापालिका आयुक्तांनी नमूद केले.

स्वच्छ अमृत महोत्सवात आज सकाळी उपवन ते येऊर गाव या मार्गावर ७.५ कि.मी अंतराची सुमारे ७५०० हजाराहून अधिक नागरिकांचा सहभाग असलेल्या मानवी साखळी तयार करण्यात आली होती. एक पाऊल स्वच्छतेकडे, माझे ठाणे स्वच्छ ठाणे, ठाण्यासाठी माझे योगदान अशा घोषणा या मानवी साखळी दरम्यान ठाणेकरांनी दिल्या. या मानवी साखळीत ठाणे महानगरपालिका शाळांतील विद्यार्थी व ठाणे शहरातील खाजगी शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सफाई मित्रांची सफाई दिंडी काढण्यात आली होती.

# सातव्या वेतन आयोगातून झालेला कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करावा

## – आमदार निरंजन डावखरे

**ठाणे :** सातवा वेतन आयोग लागू करताना ठाणे महापालिकेतील अधिकारी–कर्मचाऱ्यांवर झालेला अन्याय दूर करावा, अशी मागणी भाजपाचे आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्याकडे गुरुवारी निवेदनाद्वारे केली.

राज्य सरकारने ठाणे महापालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना मार्च २०२१ मध्ये सातवा वेतन आयोग लागू करण्याचे आदेश पारित केले होते. तर ऑक्टोबर २०२१ मध्ये तत्कालीन पालकमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी कोणत्याही कर्मचाऱ्याचे वेतन कमी न करण्याची ग्वाही देऊन आयोग लागू करण्याची घोषणा केली होती. मात्र, सद्यस्थितीत सुमारे ८० ते ९० टक्के कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू झालेला नाही. याबद्दल आमदार डावखरे यांनी खंत व्यक्त केली आहे.

सध्या महापालिकेतील जुने कर्मचारी निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. अनेक कर्मचाऱ्यांची २५ ते ३० वर्ष सेवा झालेली आहे. अशा कर्मचाऱ्यांनाही सातव्या वेतन आयोगाचा लाभ मिळालेला नाही. तसेच प्रशासनाने शासनाच्या समकक्ष निर्देशांचा विपर्यास्त अर्थ घेऊन सरसकट कर्मचाऱ्यांचे ग्रेड पे कमी केले आहेत. त्यामुळे ग्रेड पे बरोबरच घरभाडे, महागाई भत्ता कमी झालेला आहे.

या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी सातव्या वेतन आयोगाबाबत नव्या समितीची स्थापना करावी. तसेच शासन निर्देशातून समकक्षबाबत शासनाकडे पुनर्विलोकन करावे. या प्रकरणी न्यायालयात गेलेल्या कामगार संघटनेबरोबर समन्वय साधून सर्वसमावेशक मार्ग काढावा, अशी मागणी आमदार डावखरे यांनी केली आहे.

## महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात 'श्वान दत्तक योजना' राबवा

### सरकारकडे आमदार सरनाईक यांची मागणी

**ठाणे :** सद्यस्थितीत भटक्या श्वानांच्या समस्या ही चिंतेचा विषय आहे. भटक्या श्वानांमुळे नागरिक हैराण आहेत. भटक्या श्वानांमुळे मानवी आरोग्यावर अनेक नकारात्मक परिणाम होत आहेत. भटके श्वान मागे लागल्याने वाहनांचे अपघातही होतात. परंतु माणुसकीच्या दृष्टीने भटक्या श्वानांनाही जगण्याचा अधिकार असल्याने शहरातील भटक्या श्वानांची समस्या दूर करण्यासाठी व त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य सरकारने स्पष्ट धोरण ठरवून श्वान दत्तक योजना सुरु करावी, अशी मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्येकडे केली.

भटक्या श्वानांनी दंश केल्याने हजारो लोक वर्षाला जखमी होत असतात, अशी वेगवेगळ्या शहरांची आकडेवारी सांगते. त्यातील गरीब-मध्यमवर्गीय लोक सरकारी व पालिकेच्या आरोग्य केंद्रात उपचार - इंजेक्शन घेण्यासाठी जातात. तर खासगी रूग्णालयातही श्वान दंशाचे पेशंट मोठ्या संख्येने वाढत आहेत. भटक्या श्वानांनी लहान मुलांवर हल्ले केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. भटक्या श्वानांच्या उपद्रवामुळे नागरिक वैतागले असून देखील त्यांच्यासाठी अनेक प्राणीमित्र चांगले काम करीत आहेत. प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. त्यामुळे जखमी आजारी भटक्या श्वानांसाठी शासकीय पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालये, खासगी पाळीव प्राण्यांचे दवाखाने, श्वान निर्बिजीकरण केंद्रे यांच्या माध्यमातून त्यांच्यावर उपचार करणे व नसबंदीबाबत मार्ग काढणे शक्य आहे. परंतु असे होताना दिसत नसून अनेक नगरपालिका, महापालिका यांचे याबाबत कोणतेही धोरण नाही. त्यामुळे भटक्या श्वानांच्या निर्बिजीकरण शस्त्रक्रियेनंतर त्यांचे लसीकरण व त्यांना ठणठणीत बरे करून मोठ्या प्रमाणात त्यांच्यासाठी श्वान दत्तक योजना राबविली जावी. तसेच या योजनेतून भटके श्वान दत्तक दिल्यामुळे रस्त्यावरून हळूहळू हे श्वान कमी होतील. जेणेकरून नागरिकांना होणारा उपद्रवही कमी होईल. असेही आमदार सरनाईक यांनी सांगितले आहे.

## स्वच्छता अमृत महोत्सवात विद्यार्थ्यांची चित्रकला आणि 'टाकाऊ ते टिकावू' प्रकल्पांची स्पर्धा

**ठाणे:** केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २ ऑक्टोबरपर्यंत स्वच्छता अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. यामध्ये 'इंडियन स्वच्छता लीग' हा स्वच्छता विषयक देशव्यापी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने ठाणे शहरात वेगवेगळ्या ठिकाणी लोकसहभागातून स्वच्छता विषयक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमांची सुरूवात शुक्रवार, २३ सप्टेंबर रोजी दोन टप्प्यात होणार आहे. सकाळी, उपवन तलाव ते येऊर गाव या भागात मानवी साखळी आणि श्रमदानाने परिसराची स्वच्छता करण्यात येणार आहे. तर, दुपारी, दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृहात ६५० शाळांचा सहभाग असलेली चित्रकला स्पर्धा आणि 'टाकाऊ ते टिकावू' ही कला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या निमित्ताने 'ठाणे टायगर्स' या अभिनव उपक्रमाचाही आरंभ होणार आहे.

> **६५० शाळांचा सहभाग, दादोजी कोंडदेव प्रेक्षागृहात होणार स्पर्धा**

उपवन तलाव ते येऊर गाव या मार्गावर ७.५ किमी अंतराची सुमारे ७५०० नागरिकांचा सहभाग असलेली मानवी साखळी तयार केली जाणार आहे. हे नागरिक श्रमदान करून त्यांच्या आसपासच्या परिसरातील कचरा गोळा करतील आणि स्वच्छता अमृत महोत्सवात सहभागी होतील. त्याच बरोबर, सफाई मित्रांची सफाई दिंडी, स्वच्छता दूतांना विविध सामग्रीचे वाटप, ठाणे स्वच्छता लीगचे उद्घाटन, कचरावेचकांची आरोग्य तपासणी, शालेय विद्यार्थी चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ठाणे महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी दिली.

केंद्र सरकारच्या नगरविकास विभागाने स्वच्छतेचा अमृत महोत्सव साजरा करताना 'इंडियन स्वच्छता लीग' हा राष्ट्रीय उपक्रम जाहीर केला आहे. त्यात, देशभरातील १८०० हून अधिक शहरे सहभागी होत आहेत. यामध्ये लोकसहभागावर भर असून स्वच्छता कार्यात तरूणाईचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यासाठी कचरा विरोधात युवक (Youth V/s Garbage) ही टॅगलाईन जाहीर करण्यात आली आहे. या माध्यमातून प्रत्येक शहराने आपला संघ तयार करणे व या संघाचा कर्णधार जाहीर करणे अपेक्षित आहे. त्यानुसार, समस्त ठाणेकरांचे प्रतिनिधित्व करणारा 'ठाणे टायगर्स' हा संघ जाहीर करण्यात आला आहे. या संघाच्या शुभेच्छा दूताचे (चरीलें) अनावरणही प्रशासक तथा आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या हस्ते याच सोहळ्यात करण्यात येईल.

शुक्रवार, २३ सप्टेंबर रोजी उपवन तलाव परिसर आणि दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृहात संपन्न होणाऱ्या 'इंडियन स्वच्छता लीग'च्या कार्यक्रमात शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ठाणेकर युवकांनीही याप्रसंगी स्वयंस्फुर्तीने उपस्थित राहून राष्ट्रीय स्वच्छता उपक्रमात आपला सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासक तथा आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी केले आहे.

उपवन येथील सोहळ्यात महाविद्यालीयन विद्यार्थी पथनाट्य आणि फ्लॅशमॉबही सादर करणार आहेत.

### कचऱ्यातील अद्भुत जग

स्वच्छता अमृत महोत्सवाच्या निमित्ताने कोपरी येथे 'कचऱ्यातील अद्भुत जग' या आगळ्यावेगळ्या संग्रहालायचे उद्घाटनही करण्यात येणार आहे. शहरातील कचऱ्यातून हाती आलेल्या संग्राह्य गोष्टी येथे पाहाता येतील. त्याचबरोबर, कोपरी आणि सिडको येथील नव्याने विकसित करण्यात आलेल्या व्यायामशाळांचे लोकार्पणही करण्यात येईल.

### ठाणे स्वच्छता लीग

'इंडियन स्वच्छता लीग'च्या धर्तीवर ठाणे महापालिकेने प्रभाग समिती स्तरावर 'ठाणे स्वच्छता लीग'चे आयोजन केले आहे. त्यात नऊ प्रभाग समित्यांचे नऊ संघ सहभागी होतील. या संघांना नौपाडा नायक, मानपाडा मावळे, उथळसर योद्धा, लोकमान्य लिजंड्स, दिवा डेअरडेव्हिल्स, मुंब्रा मस्केटिअर्स, कळवा नाईट्स, वागळे वॉरिअर्स, वर्तक वीर अशी नावे देण्यात आली आहेत.

## दिव्यातील पाणी वितरण व्यवस्थेत घोळ, टँकर माफियांना अभय, दिवा प्रभाग समितीचे उपअभियंता वाघिरे यांची चौकशी करा! - रोहिदास मुंडे

**दिवा:-** दिव्यातील पाणी समस्येला उपअभियंता सुरेश वाघिरे हे जबाबदार असून त्यांच्या मनमानी व भ्रष्ट कारभारामुळे दिव्यात अनेक ठिकाणी अनधिकृत पाईपलाईन जोडणी देण्यात आली आहे.वाघिरे हे टँकर माफियांना पाठीशी घालत आहेत असा गंभीर आरोप भाजपचे दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी केला असून वाघिरे यांच्या चौकशीची मागणी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

दिवा शहरात नव्याने पालिकेने मंजूर केलेला पाईपलाईन अद्याप टाकण्यात आलेल्या नाहीत,त्या टाकण्यास वाघिरे चालढकल करत आहेत असा आरोप करत भाजपचे रोहिदास मुंडे यांनी वाघिरे यांच्या कामाची चौकशी करण्याची मागणी पालिका अतिरिक्त नगर अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्याकडे केली आहे

दिवा शहरात भारतीय जनता पार्टी मार्फत पाण्यासाठी आंदोलन करण्यात आल्यानंतर प्रशासनामार्फत अनेक नवीन पाईपलाईन मंजूर झाल्या. त्या पाण्याच्या पाईपलाईनचे पाईप शहरातील विविध भागात टाकण्यात आले आहेत. मात्र पाणी खात्याचे अभियंता वाघिरे हे दिव्यातील पाणी समस्या कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून काम सुरू करत नाहीत असे मुंडे यांनी पत्रात म्हटले आहे.

आजही अनेक भागात पाणीटंचाई आहे. अनेक ठिकाणी पाण्याच्या चोरीची लाईन देखील देण्यात आलेले आहेत. मनमानी पद्धतीने पाणी कनेक्शन देण्यात श्री. वाघरे यांचा सहभाग आहे. त्यामुळे अभियंता वाघिरे यांच्या कामाची चौकशी करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुंडे यांनी केली आहे.

## आमदार डॉ जितेंद्र आव्हाड यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री दानवे यांच्याकडे रद्द केलेल्या नॉन एसी गाड्या सुरु करण्याची केली मागणी

**ठाणे:** ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा या चार रेल्वे स्थानकातील रेल्वे प्रवाशांच्या समस्यांसाठी माजी गृहनिर्माण मंत्री तथा आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड, माजी खासदार तथा ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेतली. तसेच या भेटीदरम्यान अनेक मुद्द्यांवरती चर्चा झाली.त्याचबरोबर कळवा आणि मुंब्र्यामध्ये २७ नॉन एसी गाड्यांचा स्टॉप काढून टाकला आहे आणि १२ एसी गाड्यांचा स्टॉप वाढवला आहे, तो रद्द करुन त्याबाबत पुन:विचार करुन कार्यवाही करावी, ही मागणी केली.

रद्द केलेल्या नॉन एसटी लोकल सुरू कराव्या यासाठी माजी मंत्री आव्हाड यांनी कळवा,मुंब्रा येथे बैठका घेतला. दरम्यान त्यांनी मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या भेट घेतल्यानंतर नुकतीच त्यांच्यासह परिवहन समिती सदस्य प्रकाश पाटील, माजी नगरसेविका आशरिन राऊत, रेहान खान, इम्रान सुर्मे, संगिता पालेकर, शोएब खान, बबलू शेमना, गुड्डु खालू या शिष्टमंडळाने केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री दानवे यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने प्रमुख मागणीसह कळव्याच्या कारशेडमध्ये END प्लॅटफॉर्म तयार करावा, त्यामुळे तेथून कळवेकरांना सोप्या पद्धतीने गाडीत चढता येईल. त्याचबरोबर कळवा, मुंब्रा व दिवा भागामधील लोकसंख्येमध्ये मागील २० वर्षांमध्ये सर्वात जास्त वाढ झाली आहे. मुंबईला प्रवास करणाऱ्यांची जास्तीत जास्त संख्या या भागातील लोकांचीच आहे. अंदाजे कळवा, मुंब्रा, दिव्यामधून दिवसाला ४ ते ५ लाख प्रवासी प्रवास करतात. याचा विचार करुन दिवा येथून सुरु होणारी लोकल मार्गस्थ करावी. जेणेकरुन दिवा, मुंब्रा, कळवा येथील प्रवाशांना सोप्या पद्धतीने रेल्वेचा प्रवास करता येईल. तसेच मुंब्रा रेल्वे स्टेशनवरील लिफ्ट व एस्केलेटर्स चे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. तसेच रेतीबंदर जवळ नवीन सब वे ची निर्मिती करावी.याशिवाय स्लो ट्रॅकवरुन मेल आणि एक्सप्रेस ज्या पद्धतीने धावत आहेत, त्यामुळे पारसिकनगरच्या लोकांना होणारा आवाजाचा त्रास त्यावरती उपाय म्हणून Noise Barrier बसवावेत अशी देखिल मागणी केली. तर, एसी ट्रेन तर चालू ठेवा.

पण, त्याचबरोबर सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि खासकरुन झशरज्ञ झशीळेव मध्ये एसी ट्रेन चालवू नये. ज्यामुळे साध्या लोकलला खूपच गर्दी होते व त्यातून मृत्यूचे प्रमाण देखील वाढले आहे. ही बाब सुद्धा केंद्रीय रेल्वे राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. या भेटीमध्ये त्यांनी लगेचच संबंधीत अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्यास सांगितले.

# उक्षीतील सुधीर घाणेकरच्या 'ऑस्करची गोष्ट' ला 'बेस्ट चिल्ड्रन्स' शॉर्ट फिल्म पुरस्कार



**रत्नागिरी:–** रत्नागिरी तालुक्यातील उक्षीमधील होतकरू तरुण, अभिनेता ते लेखक, दिग्दर्शक अशा जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या सुधीर घाणेकरने नमानातील कलाकारांचा जीवन दर्शन घडवणारा 'ऑस्करची गोष्ट' हा लघुपट निर्माण केला. या लघुपटाला सत्यजित ऋत्विक मीनल इंटरनॅशनल कोलकत्ता फेस्टिवल २०२२ मध्ये 'बेस्ट चिल्ड्रन' शॉर्ट फिल्म पुरस्कार मिळाला आहे.

नमनातील, लहान मुलांना कलाकार संधी देण्यात येउन कोणत्याही इन्स्टिटयूट मध्ये न शिकता अनुभव आणि मेहनतीने ऑस्करची गोष्ट हा मराठी लघुपट बनवण्यात आला आहे. जो एका स्मार्टफोनवरती चित्रित केला गेला आहे. अभिनेता सुधीर घाणेकर याने लेखक दिग्दर्शक म्हणून केलेला हा पहिला लघुपट आहे. ध्वनी विभाग वगळता सर्व स्थानिक रत्नागिरीतील तंत्रज्ञ विभागातील स्थानिक लोकांना त्यांचा काम बघून मोठी संधी प्राप्त करून देण्यात आली.

उक्षीतील जगप्रसिद्ध कातळशील्पांचे चित्रीकरण, सामान्य शेतकरी, कष्टकरी लोकांचे जीवन, कोकणातील रूढी – परंपरा, निसर्ग सौंदर्य, जैवविविधता यांचे दर्शन घडविले आहे. अध्यात्म, ज्ञान ,विज्ञान यांची गुंफण करत संस्कृती, पर्यावरणचे विविध प्रकारे दर्शन या लघुपटाच्या कथेतुन घडविण्यात आलेले आहे. दिव्यांग मुलांचे हक्क व त्यांच्याकडे समाजाचा दृष्टिकोन अधोरेखित करत अवयवदान, शिक्षणाचे महत्व सांगणारी गोष्ट आहे. अशा या लघुपटाचे सादरीकरण सत्यजित ऋत्विक म्रीनल इंटरनॅशनल कोलकत्ता फेस्टिवल २०२२ मध्ये करण्यात आले होते. त्यामध्ये 'बेस्ट चिल्ड्रन' शॉर्ट फिल्म पुरस्कार या लघुपटाला मिळाला आहे.

# पावस बाजार पेठेतील एसटी फेऱ्या बंद

## विद्यार्थी, प्रवाशांचे होतायत हाल

रत्नागिरी तालुक्यातील पावस बाजारपेठेत एसटी फेऱ्या सुरू न झाल्याने विद्यार्थी, प्रवाशांचे मोठे हाल होत आहे. शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांना प्रवासाच्यादृष्टीने एसटी गाड्यांचा आधार आहे. कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव सुरू झाल्यापासून पावस बाजारपेठेतील एसटी सेवा बंद करण्यात आली आहे. विषाणूंचा प्रादुर्भाव कमी झाला असून राज्य शासनाने सहा महिन्यापूर्वीच सर्व प्रकारचे निर्बंध शिथिल केले आहेत. बंद असलेल्या एसटी गाड्या सुरू व्हाव्यात, यासाठी विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थांचे शिष्टमंडळ आदींनी रत्नागिरी विभाग नियंत्रक कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना एसटी गाड्या सुरू करण्याचे निवेदन सादर केले होते. रत्नागिरी आगार व्यवस्थापकांना देखील भेटून होणारी गैरसोय निदर्शनास आणून देण्यात आली होती. सर्वांच्या मागणीकडे एसटी महामंडळाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची माहिती पावस ग्रामपंचायतीचे माजी सरपंच लाईक फोडू यांनी दिली.

# रत्नागिरी बाजारपेठेत प्लास्टिक विरोधात धडक कारवाई

**रत्नागिरी:–**रत्नागिरी नगर परिषदेतर्फे शहरातील बाजारपेठ परिसरात 'एकल (सिंगल युज) प्लास्टिकविरोधात धडक कारवाई हाती घेण्यात आली आहे. या प्लास्टिक विरोधात गुरूवारी येथील बाजारपेठेत दुकानांमध्ये केलेल्या तपासणीत २० दुकानदारांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून १५ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

१ जुलै २०२२ पासून रत्नागिरीत एकल वापर प्लास्टीकच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. मात्र त्याला पर्याय म्हणुन कापडी पिशव्या, बांबु, लाकडी वस्तू, सिरामिक्सचे प्लेट, वाट्या देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी अशा निर्सगपुरक वस्तूंचा वापर अधिकाधिक करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. माझी वसुंधरा व स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत गुरूवारी रत्नागिरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तुषार बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक संदेश कांबळे व नगर परिषद कर्मचारी यांच्याद्वारे रत्नागिरी शहरातील परटवणे, गाडीतळ व गोखले नाका परिसरातील फळ विक्रेते, भाजी-पाला विकेते, स्वीट मार्ट, किराणा मालाची दुकाने या ठिकाणी सिंगल युज प्लास्टिकविरोधात धडक कारवाई करण्यात आली. यावेळी प्लास्टिक वापरणाऱ्या विक्रेत्यांकडून सुमारे १५,७००/- एवढा दंड आकारण्यात आला.



# दापोली समुद्र किनारी आढळली बोट

**दापोली:–** तालुक्यातील मुरुड समुद्रकिनारी एक बोट किनाऱ्यावर लागल्याने खळबळ उडाली . या बोटीमध्ये कोणीही व्यक्ती नसून बेवारस स्थितीत आहे . मुरुड किनाऱ्यावर ही बोट वाळूत रुतलेल्या स्थितीत आढळून आली. मच्छिमारांनी याबाबतची माहिती पोलीस आणि तटरक्षक दलाला दिली . पोलीस घटनास्थळी दाखल झाले . बोटीची चौकशी करण्याचे काम सुरु आहे. ही बोट समुद्रातील लाटांमुळे किनाऱ्यावर आदळून फुटली आहे. या बोटीबाबत नागरिकांनी घाबरुन जाण्याचे कारण नाही असे तटरक्षक दलाकडून सांगण्यात आले. किनाऱ्यावर बेवारस स्थितीत सापडलेली बोट म्हणजे पार्थ जहाजाच्या लाईफ क्राफ्टचा तो एक भाग असल्याचे तटरक्षक दलाकडून सांगण्यात आले.

# नगर परिषदेच्या शेकडो विद्यार्थ्यांनी नोंदवला चित्रकला स्पर्धेत सहभाग

**रत्नागिरी:–** महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत- पंतप्रधान जन आरोग्य योजना या सुरक्षा योजनेची ४ वर्षे पूर्ण होत असून यानिमित्ताने परकार हॉस्पिटल रत्नागिरी आणि मराठी पत्रकार परिषद रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी नगर परिषद शाळांसाठी रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचा शुभारंभ येथील दामले विद्यालयात करण्यात आले होते. यावेळी डॉ अलिमिया परकार, शिक्षणाधिकारी सुनील पाटील, मुख्याध्यापक जाधव, मराठी पत्रकार परिषदेच्या जान्हवी पाटील, ज्येष्ठ पत्रकार भालचंद्र नाचणकर, जिल्हा कार्याध्यक्ष राजेश शेळके, तालुकाध्यक्ष आनंद तापेकर, माजी अध्यक्ष हेमंत वणजू, मुश्ताक खान, प्रसिद्धी प्रमुख, सचिव जमीर खलफे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रास्तावना डॉ . अनुराधा लेले यांनी केले.

उज्वल भारत घडवण्याचे सामर्थ्य हे विद्यार्थ्यांच्या हातात आहे, त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम नेहमीच घेण्याचा आमचा प्रयत्न असतो अशी प्रतिक्रिया डॉ अलिमिया परकार यांनी व्यक्त केले. परकार हॉस्पिटल आणि मराठी पत्रकार परिषदेच्या उपक्रमाचे शिक्षणाधिकारी सुनील पाटील यांनी कौतुक केले, मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम घेणे आवश्यक असते त्यामुळे असेच अनेक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी घेण्यात यावे यासाठी आवश्यक सहकार्य आपण करू



असेही त्यांनी सांगितले.

या रंगभरण आणि चित्रकला स्पर्धेत नगर परिषद शाळांमधील जवळपास ९०० विद्यार्थी सहभागी झाले होते शहरातील १८ शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ २९ सप्टेंबर रोजी पार पडणार असल्याची माहिती डॉ अनुराधा लेले यांनी दिली.

# लांज्यात बंद घर फोडून पावणे दोन लाखांचा ऐवज लंपास

**लांजा:–**घर बंद असल्याचा फायदा उठवत अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने, तसेच पितलेची भांडी व रोख रक्कम असा एकूण १ लाख ७६ हजार १०० रुपये किंमतीचा ऐवज चोरीस गेल्याची घटना वेरवली बु. येथे घडली आहे.

वेरवली बु. वरचीवाडी येथील सुजाता शरद आंबर्डेकर (५९) या घर बंद करुन दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वा. आपल्या मुलाकडे गेल्या होत्या. त्यानंतर सुजाता या दि. २२ सप्टेंबर रोजी १२.३० वा. वेरवली येथे आपल्या घरी आल्यानंतर त्यांना घराच्या लाखडी खिडकीचा गज काढल्याचे दिसून आले, तसेच घराची कौले काढून चोरी झाल्याचे लक्षात आले. घरातील सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम कपाटातून गायब झाल्याचे लक्षात आले. घरातील ताब्याची भांडी देखील चोरीस गेल्याने जवळपास १ लाख ७६ हजार १०० रुपये किंमतीचा ऐवज चोरट्याने चोरुन घेऊन गेल्याने सुजाता शरद आंबर्डेकर यांनी लांजा पोलिसात दिल्यावरुन अज्ञात चोरट्याविरोधात लांजा पोलिसांनी गुरुवारी रात्री उशिरा चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## जखमी बगळ्याला जीवनदान

**ठाणे:** येथील कोपरी पूर्वेतील चेंदणी कोळीवाडा बंदरावरील विसर्जन घाट या खाडी किनाऱ्यावर जखमीवस्थेत बुधवारी सकाळी आढळून आलेल्या एका बगळ्याला ठाणे महापालिका कर्मचारी तथा पक्षीमित्र भरत मोरे यांनी जीवदान दिले. मोरे यांनी त्या जखमी बगळ्याला तातडीने पकडून उपचारार्थ दाखल केले आहे. त्या बगळ्याच्या पंखाला गंभीर दुखापत झाल्याने त्याला नीट उडताही येत नव्हते. असे ही मोरे यांनी बोलताना सांगितले.



## माजी राष्ट्रपतींची माजी आमदार कांती कोळी यांच्या स्मृतिदिनी हजेरी

**ठाणे:** काँग्रेसचे माजी आमदार आणि कोळी समाजाचे दिवंगत नेते कांती कोळी यांच्या प्रथम स्मृतिदिनाचा कार्यक्रम गुरुवारी ठाण्यातील चेंदणी कोळीवाडा येथील कोळी समाज हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमास भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी हजेरी लावली. यावेळी त्यांनी दिवंगत क्रांती कोळी यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी क्रांती कोळी यांच्या कुटुंबियांची विचारपूसही केली. सुमारे पंधरा मिनिटांच्या या उपस्थितीनंतर ते थेट मुंबईच्या दिशेने रवाना झाले.तर माजी राष्ट्रपती कोविंद आणि दिवंगत कांती कोळी यांचे जवळचे संबंध असल्याचे सांगण्यात येत आहे.

# जुनी पेन्शनसाठी ठाण्यात बाईक रॅली



**ठाणे:** जुनी पेन्शन लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी बुधवारी राज्य सरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका आदींचे कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन ठाणे जिल्हा परिषदेपासून ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत बाईक रॅली काढून आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील विविध विभागातील शासकीय कर्मचारी सहभागी झाले होते.

राज्य शासनाने नोव्हेंबर २००५ पासून या कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन बंद केली आहे. ती पुन्हा लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यभरातील कर्मचाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली बुधवारी राज्यस्तरीय आंदोलन छेडण्यात आले. त्यानुसार बुधवारी जिल्ह्यातील सर्व कर्मचारी एकत्र येऊन बाईक रॅली काढण्यात आली. यासाठी जिल्ह्यातील व शहरातील कर्मचारी, अधिकारी येथील जिल्हा परिषदेच्या चौकात एकत्र जमले होते. दुपारी १२ वाजता या रॅलीला सुरुवात झाली हि रॅली मुख्य बाजारपेठेतून सरळ कोर्ट नाक्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ येवून थांबली. यावेळी या रॅलीचे सभेत रूपांतर झाले. त्यानंतर या आंदोलनकर्त्यांचे शिष्टमंडळ ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांची भेट घेऊन त्यांनी जुनी पेन्शन लागू करण्याच्या मागणीचे निवेदन दिले. कर्मचाऱ्यांच्या मागणीचा तातडीने विचार करून त्यावर योग्यती कार्यवाही करावी, अशी मागणी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस भास्कर गव्हाळे यांनी दिली आहे.

# लम्पी आजारामुळे मृत्यू पावलेल्या जनावरांच्या पशुपालकांना मिळणार नुकसान भरपाई

**ठाणे :** लम्पि त्वचारोगाचा संसर्ग टाळण्यासाठी जिल्ह्यात लसीकरणाचा वेग वाढविल्यामुळे लम्पी त्वचा रोगनियंत्रणात आहे. या रोगाने बाधित पशुधनावरील उपचाराचा सर्व खर्च राज्य शासनामार्फत मोफत करण्यात येत असून लसीकरण, उपचार व शवविच्छेदन या सेवा पशुसंवर्धन विभागामार्फत मोफत दिल्या जात आहेत. जिल्हा नियोजन समितीमार्फत प्रत्येक जिल्ह्यास १ कोटी निधी तातडीने उपलब्ध करण्यात आला आहे. या रोगामुळे मृत जनावरांच्या पशुपालकांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर यांनी दिली आहे.

या रोगाने मृत पावलेल्या जनावरांच्या पशुपालकास नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. यामध्ये दुधाळ जनावरांसाठी ३० हजार रुपये, ओढकाम करणाऱ्या जनावरासाठी २५ हजार आणि मृत वासरासाठी १६ हजार रुपये भरपाई मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले आहे.

सध्या जिल्ह्यात एकूण २७ केंद्रबिंदू आहेत. एकूण १०४ जनावरे बाधित असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. जिल्ह्यात एकूण ४ जनावरे या रोगाने मृत झाली आहेत. ठाणे जिल्ह्यात एकूण ८०५३२ इतके गो-वर्गीय पशुधन असून त्यापैकी आतापर्यंत १६९६५ जनावरांचे लसीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. लम्पी त्वचा रोगाचा प्रसार व हानी पाहता राज्य शासनामार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपाययोजनांमुळे लम्पी त्वचा रोगनियंत्रणात आणण्यास पशुसंवर्धन विभागास यश येत आहे.

लम्पी त्वचा रोगाचा प्रसार रोखण्याकरिता सर्वत्र लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. सर्व जनावरांचे लसीकरण ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. तोडणकर यांनी दिली आहे.

पशुसंवर्धन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राज्यात शिघ्रकृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्हास्तरावर औषधांची ड्रग्स बँक देण्यात येणार असल्याचे पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय मंत्री महोदय यांनी जाहीर केले आहे.

# क्षत्रिय वेखंडे ठरला कॅंडिडेट मास्टर




**ठाणे : वयाच्या १३ व्या वर्षाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या क्षत्रिय नितीन वेखंडेने अवघ्या महिनाभराच्या कालावधीत २२२४ फिडे गुणांची कमाई करत जागतिक बुद्धिबळ संघटनेचा (फिडे) कॅंडिडेट मास्टर 'किताब आपल्या नावे केला.**

चेस गुरु अकॅडमीत अमित पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बुद्धिबळाचा सराव करणाऱ्या क्षत्रियने जुलै ते ऑगस्ट अशा महिनाभराच्या कालावधीत स्पेन येथे खेळल्या गेलेल्या चार विविध स्पर्धांमध्ये आपली छाप पाडत हा 'किताब मिळवला.या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याआधी क्षत्रियच्या नावावर १७८२ फिडे गुण जमा होते. क्षत्रियने या स्पर्धांमध्ये आपल्यापेक्षा जास्त गुण असणाऱ्या बुद्धिबळपटूंना मात देत एकूण २२२४ गुणांसह कॅंडिडेट किताबाला गवसणी घातली. याआधी क्षत्रियने गतवर्षी १२ वर्षाखालील वयोगटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते. क्षत्रियच्या जोडीने त्याचा भाऊ वेदांतनेही या चार स्पर्धांमध्ये प्रभावी कामगिरी करत आपली दाखल घ्यायला लावली. या स्पर्धांमधून वेदांतने १७३१ गुणावरून २१७८ फिडे गुणांवर झेप घेतली. यासंदर्भात त्यांचे प्रशिक्षक अमित पांचाळ म्हणाले करोना महामारीमुळे क्षत्रिय आणि वेदांतला स्पर्धांमध्ये सहभागी होण्यात मर्यादा आल्या होत्या. पण नाउमेद न होता या दोघांनीही अभ्यास आणि खेळाची सांगड आपला ऑनलाईन सराव सुरु ठेवला होता. त्याचे चांगले फळ त्यांना मिळाले आहे.

# ठाण्यात २६ सप्टेंबरपासून माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत येत्या २६ सप्टेंबर ते २६ ऑक्टोबर या कालावधीत माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानामध्ये १८ वर्षापुढील महिलांची तपासणी केली जाणार असून त्यांचे जीवनमान उंचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

घरातील माता सुरक्षित तर घर सुरक्षित असे म्हटले जाते. मात्र हीच माता आजारी पडली तर घर देखील कोलमडून जाते हे सर्वानाच माहित आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहावे या उद्देशाने राज्य शासनाच्या आरोग्य विभागामार्फत हे पाऊल उचलण्यात आले आहे. त्यानुसार ठामपाच्या माध्यमातून हे अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तब्बल महिनाभर हे अभियान राबविले जाणार आहे.

# लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला सामोरे जाताना संवाद कौशल्य व दैनंदिन घडामोडींचे ज्ञान आवश्यक

**ठाणे :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या पूर्व, मुख्य आणि मुलाखत या तिन्ही टप्याला सामोरे जाताना किंवा कोणत्याही स्पर्धा परीक्षेत व कोणत्याही क्षेत्रात दैदिप्यमान असे यश संपादन करायचे असेल, तर ध्येयनिश्चिती त्या अनुषंगाने प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे, योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, संवाद कौशल्य, आलेल्या ताण-तणावाचे व्यवस्थापन व दैनंदिन घडामोडीचे मूल्यमापन करणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी संवाद व मार्गदर्शन या व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांना केले.

ठाणे महानगरपालिका आयुक्त डॉ.विपिन शर्मा यांच्या निर्देशानुसार नुकतेच डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील पूर्व परीक्षा मार्गदर्शन वर्ग २०२२-२३ आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग २०२२-२३ मधील प्रशिक्षणार्थी करीता डॉ. विपिन शर्मा भाप्रसे यांचे संवाद आणि मार्गदर्शन हे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आणि प्रशासकीय सेवेत काम करताना विद्यार्थ्यांचा उक्त्रखउए फार महत्वाचा आहे. आपल्याला आपले आयुष्य सुखी, आनंदी, समाधानी व समृद्ध करणे करीता एखादी गोष्ट आपण का करतोय ? का करावी ? या करीता तुमचा उक्त्रखउए हा घटक महत्वाची भुमिका पार पाडतो. प्रशासकीय सेवेत काम करताना विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन व रोल कसा असावा ? लोकांप्रती व समाजाप्रती कोणती भावना असावी ? गोर-गरीब किंवा आपल्याकडे कामाकरीता आलेल्या




नागरिकांची प्रामाणिकपणे काम केल्यानंतर मिळणारे आशीर्वाद व समाधान किती महत्वाचे आहे ? याबाबत महापालिका आयुक्त डॉ. शर्मा यांनी प्रशिक्षणार्थींना/ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या व्याख्यान चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थांकरीता आयोजित करण्यात आलेले असून, तसेच सदर व्याख्यानाला ठाणे व मुंबई शहरातील विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उस्फूर्त असा प्रतिसाद दिलेला आहे. आयुक्त डॉ. शर्मा यांच्या संवाद आणि मार्गदर्शन या व्याख्यानामुळे विद्यार्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले असून, विद्यार्थ्यांनी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेवर कौतुकाचा वर्षाव केलेला आहे. सदर कार्यक्रमास संस्थेचे उपआयुक्त अनघा कदम आणि संस्थेचे संचालक महादेव जगताप उपस्थित होते.



# ठाण्यात रामदास कदमांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे शिवसैनिकांकडून दहन

**ठाणे:** रामदास कदम यांनी केलेल्या गलिच्छ आणि अशलाध्य वक्तव्याच्या निषेधार्थ ठाण्यात संतप्त शिवसैनिकांनी कदम यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला चप्पलांचे जोडो मारून त्यानंतर त्या पुतळ्याचे मंगळवारी ठाण्यातील चिंतामणी चौकात दहन केले. यावेळी त्यांच्याविरोधात घोषणा बाजी करत, त्यांना यापुढे महाराष्ट्रात फिरून देणार नाही, असा इशाराही शिवसैनिकांनी दिला.

ठाण्याचे खासदार राजन विचारे आणि जिल्हाप्रमुख केदार दिघे यांच्या नेतृत्वाखाली रामदास कदम यांना ठाण्यात शिवसैनिकांकडून हे निषेधार्थ आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी, रामदास कदम मुर्दाबाद, ५० खोके, निम का पत्ता कडवा है, रामदास कदम... येवढी माणसे कश्यासाठी..., अशी घोषणा बाजी करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक मधूकर देशमुख, संजय तरे, चिंतामणी कारखाणीस, महिला शिवसैनिकांचा मोठया प्रमाणात सहभागी झाल्या होता. यावेळी बोलताना खासदार विचारे यांनी कदम यांनी रामदास या नावालाही कलंक लावला आहे. त्यांच्या वक्तव्याचा आम्ही जाहिर निषेध करतो, असेही म्हणाले. तर केदार दिघे यांनी कदमांना आपला पराभव दिसू लागला आहे. त्यांचे फिरलेले डोके त्यांनी वेळीच जागेवर आणले नाहीतर त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशाराही दिला.



# ठाण्याच्या आपला दवाखान्याच्या भिंतीला तडे

**ठाणे:** सिद्धेश्वर तलाव, येथे ओम साई आशीर्वाद चाळीसमोर असलेल्या ठाणे महानगरपालिकेच्या आपला दवाखाना या दवाखान्याच्या भिंतीला तडे गेल्याची बाब सोमवारी सायंकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. तडे गेलेली भिंत धोकादायक झाली आहे. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत नाही. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी माजी लोकप्रतिनिधी नंदिनी विचारे, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी, कनिष्ठ अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग, उथळसर प्रभाग समिती) यांनी धाव घेतली. तसेच तातडीने आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी सुरक्षेच्या कारणास्तव दवाखान्याच्या बाजूने धोकापट्टी बांधून बॅरिकेटिंग केली असून तक्रारीची संबंधित विभागाने नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना केली. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

# झाडाची फांदी घरावर पडली

**ठाणे:** गोकुळ नगर येथील शंकर मंदिर व जवळच असलेल्या धनंजय गुप्ता यांच्या तळ अधिक एक मजली घरावरती झाडाची मोठी फांदी पडल्याची सोमवारी सकाळी ९.१२ मिनिटांच्या सुमारास घडली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत, पडलेली फांदी कापून बाजूला केली. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

# राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्यानिमित्त ठाण्यात दाखले वाटप

**ठाणे :** राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्यानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने मंगळवारी राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या कोकण महसूल विभागाचे प्रभारी आयुक्त डॉ. किरण जाधव यांच्या हस्ते दाखले वाटप करण्यात आले.

जिल्ह्यात सध्या राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्याअंतर्गत जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध सेवांचा निपटारा करण्यात येत आहे. त्याअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने विविध दाखल्यांचे वाटप नागरिकांना करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, आयोगाचे सहसचिव माणिक दिवे, अपर जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी डॉ. रुपाली सातपुते, उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, उपविभागीय अधिकारी अविनाश शिंदे, बाळासाहेब वाकचौरे, जिल्हा पुरवठा अधिकारी राजू थोटे, उप मुख्य कार्यकारी



अधिकारी अविनाश सातपुते, भूमी अभिलेखाचे जिल्हा अधिक्षक बाबासाहेब रेडेकर आदी उपस्थित होते. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात पाच जणांना दाखल्यांचे वाटप करण्यात आले. डॉ. जाधव म्हणाले की, नागरिकांना सुलभपद्धतीने व वेळेत दाखले देऊन सेवा देण्यात ठाणे जिल्हा आघाडीवर आहे. शाळा/महाविद्यालयांमध्ये दाखले वाटप, इंद्रधनु उपक्रमाअंतर्गत दाखले वाटप तसेच दाखले वाटपासाठी शिबिरांचे आयोजन असे नाविण्यपूर्ण उपक्रम जिल्हा प्रशासनाने राबविले आहेत. यावेळी जिल्हाधिकारी नार्वेकर यांनी नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांबद्दल माहिती दिली.